मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ९ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • सप्टेंबर - २०१९



# हस्ती दुनिया (मराठी)

**अंक ९ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • सप्टेंबर २०१९**

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

**(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)**

---

**संपादक**
**राजेंद्र थोरात** (अवैतनिक)

**सहसंपादक**
**सुरेश तिर्लोटकर**

**सजावट व चित्रे**
**संजय तु. जालगांवकर • आतिश चं. शिंदे**
**राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील**

---

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

---

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

---

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## स्तंभ


- दोन शब्द — ०४
- दादाला विचारु या — १०
- विचारपुष्प — १२
- शब्दकोडे — १४
- आरोग्याचा मंत्र — २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा — २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे — ३०
- दिव्यवाणी — ३१
- हसा मुलांनो हसा — ३२
- सामान्य ज्ञान — ४६
- चित्र काढा आणि रंग भरा — ५०



## चित्रकथा


- आजोबा — १६
- किट्टी — ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- चांद्रभरारी ०५
- आचार्य विनोबा भावे ११
- वेगवेगळ्या देशाचे राष्ट्रध्वज २२
- दुर्गभ्रमंती २८
- समर्थ दर्शन -५९ ३४
- सत्कर्मयोगे वय घालवावे ३७
- सकारात्मक विचारांचा दृष्टिकोन ४३
- आपले जिल्हे - परभणी ४४
- तेजस्विनी - ८९ ४५
- पक्षीजगत ४७





## कथा


- कुश लव यांचा जन्म ०६
- संस्कारांचं महत्व ०८
- बलिदान नाही... योगदान २०
- मौल्यवान वस्तू २१
- अकबराला भेटला बिरबल ३५
- सारी ईश्वराची संतान ४२
- लोभी भटजी ४८








## कविता


- देव माणसातला १५
- किती माझे प्रश्न २३
- येता सत्संगात ४९

# बाप्पाचं घर

अनंत चतुर्दशीचा दिवस होता.आजी पिंकीला घेऊन समुद्रकिनारी गेली. वाजत–गाजत येणारे गणपती पाण्यात खोलवर नेऊन बुडवले जात होते. पिंकीने आजीला विचारले, "आजी बाप्पाला पाण्यात का बुडवतात गं?" आजी म्हणाली, "तिथे बाप्पाचं घर आहे." "मग आपण पण जाऊ या का बाप्पाच्या घरी?" पिंकीने भाबडेपणाने आजीला विचारले. त्यावर आजी रागावत म्हणाली, "हे बघ पिंके, असं काही बोलायचं नाही हं, बाप्पाला राग येतो!" आजीच्या उत्तरावर पिंकी रडवेली होत शांत झाली खरी ; पण तिच्या बालसुलभ मनात मात्र विचारांचं काहूर उठलं. एवढ्या सुंदर साजिऱ्या बाप्पाला दहा बारा दिवस मखरात बसवायचं, त्याच्या अवती भोवती सजावट करायची, आरती म्हणायची, नैवेद्य दाखायचा आणि नंतर... खुशाल निर्दयीपणे पाण्यात बुडवून टाकायचं? खरंच मोठी माणसं शहाणी असतात की वेडी तेच कळत नाही. त्यापेक्षा आपण उद्या शाळेत गेल्यावर बाईंनाच विचारू.

दुसऱ्या दिवशी पिंकी शाळेत गेली आणि बाईंना म्हणाली, "बाई एक प्रश्न विचारु?" बाई खूप समंजस आणि प्रेमळ होत्या. त्या म्हणाल्या, "विचार ना बाळ!" पिंकीने तिला पडलेला प्रश्न एका दमात सांगून टाकला. त्यावर बाई तिला जवळ घेत म्हणाल्या, "बाळ, खरं तर गणपती बाप्पा बसवणं त्याचा उत्सव साजरा करणं हे केवळ आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी एक निमित्त होतं. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताने लोकांना एकत्र आणणे, त्यांच्यात एकोपा, प्रेम निर्माण करणे, देशभक्तीची भावना निर्माण करणे यासाठी लोकमान्य टिळकांनी ही युक्ती काढली ; पण आज मात्र तो रिवाज बनला आहे. लोक घराघरात गणपती बसवू लागले. ठीक आहे, या निमित्ताने नातेवाईक एकत्र येतात. आनंदाने राहतात. आता प्रश्न आहे विसर्जनाचा. गणपती बाप्पाला मुळात कोणताही आकार, रंग, रुप नाही. त्याला जन्म - मृत्यू नसतो. संपूर्ण विश्वात सदैव निराकार रुपात राहून साऱ्या सृष्टीचं चलन-वलन करतो. आपल्या सर्वांच्या हृदयात आत्मारुपाने राहून आपल्याला चालवतो, बोलवतो. अशा या बाप्पाला लोकांनी मूर्ती समजू नये. बाप्पाने भक्तांसाठी हे रुप काही काळासाठी धारण केलं होतं. त्यात आपण अडकून राहू नये म्हणून बाप्पाच्या मूर्तीचं विसर्जन केलं जातं. आता कळलं?"

एकाग्रचित्ताने बाईंचं बोलणं ऐकल्यावर पिंकी चटकन म्हणाली, "आता कळलं, बाप्पाचं घर पाण्यात नाहीये; तर आपणच बाप्पाच्या घरात राहतोय! आता मी आजीला सांगणार बाप्पाचं घर कुठे आहे ते!"

- राजेंद्र थोरात



# चांद्रभरारी

भारताचे 'चांद्रयान-२' हे महत्त्वाकांक्षी यान २२ जुलै सोमवारी दुपारी यशस्वीरीत्या चंद्राच्या दिशेने झेपावले आणि भारताने अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात भरारी घेतली. 'काऊंट डाऊन' संपताच नारिंगी रंगाच्या समांतर ज्वाळांचे लोट खाली सारत 'जीएसएलव्ही मार्क३' हा प्रक्षेपक (प्रचंड ताकदीमुळे त्याचा उल्लेख 'बाहुबली रॉकेट' असा केला जातो) वेगाने आकाशाच्या दिशेने झेपावला. श्रीहरिकोटा बेटावर देशभरातून आलेल्या आबालवृध्दांच्या समुदायाने भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) शास्त्रज्ञांची आणि स्वदेशी तंत्रज्ञानाची कमाल 'याची देही याची डोळा' अनुभवली. देशाच्या दुसऱ्या चांद्रमोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे सर झाला आणि 'चांद्रयान- २' चंद्राच्या दिशेने मार्गस्थ झाले!

इस्त्रोच्या 'जीएसएलव्ही मार्क ३' ने श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रावरुन सोमवारी दुपारी २ वाजून ४३ मिनिटांनी यशस्वी उड्डाण केले. उड्डाणानंतर १६ मिनिटे आणि १४ सेकंदानी 'चांद्रयान - २' ला पृथ्वीभोवती १६९ बाय ४५,४७५ किलोमीटरच्या दीर्घवर्तुळाकार कक्षेत प्रस्थापित करण्यात इस्त्रोच्या शास्त्रज्ञांना यश आले. 'जीएसएलव्ही मार्क ३' या अजस्त्र रॉकेटचे पहिलेच ऑपरेशनल उड्डाण होते. 'चांद्रयान -२' च्या रुपाने भारतीय भूमीवरून अवकाशात सर्वाधिक वजनाचे (३,८७२ किलो) प्रक्षेपण करण्याचाही विक्रम घडला.

सोमवारच्या प्रक्षेपणातून भारताच्या दुसऱ्या चांद्रमोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला असून, आता 'चांद्रयान -२' ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवण्याचे आव्हान 'इस्त्रो' समोर असणार आहे. पृथ्वीभोवतीच्या कक्षेत पोहचल्यावर यानाचे सोलार पॅनेल स्वयंचलित पद्धतीने उघडले असून, इस्त्रो टेलिमेट्री, ट्रॅकिंग अँड कमांड नेटवर्क ने (इसट्रॅक) यानावर नियंत्रण मिळवले आहे. पुढील महिन्याभराच्या कालावधीमध्ये यानावर बसवण्यात आलेल्या इंधन यंत्रणेच्या मदतीने यानाची पृथ्वीभोवतीची कक्षा टप्प्याटप्प्याने वाढवून चंद्रापर्यंत नेण्यात येईल. त्यानंतर यानाला चंद्राभोवतीच्या कक्षेत प्रस्थापित करुन, 'विक्रम' लँडर आणि 'प्रज्ञान' रोव्हरला ७ सप्टेंबरला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवले जाईल.

❖❖❖

# कुश लव यांचा जन्म

श्रीरामांच्या सल्ल्यानुसार शत्रुघ्नाने आपली सुसज्ज सेना पुढे पाठवली व नंतर महिन्याभराने तो पाठीमागून निघाला. साधारण वर्षाकालात आपली व लवणासुराची गाठ पडेल, अशा बेताने तो निघाला. कारण वर्षाऋतूच्या काळातच लवणासुर मारला जाईल, असेही श्रीराम म्हणाले होते.

रस्त्यात दोन दिवस घालवल्यावर शत्रुघ्न तिसऱ्या दिवशी महर्षी वाल्मिकींच्या पवित्र आश्रमात पोहोचला. तेथे एका जागी प्राचीन काळी झालेल्या यज्ञसोहळ्याचे अवशेष दिसत होते. ते पाहिल्यावर शत्रुघ्नच्या मनात त्याविषयी कुतूहल निर्माण झाले. तेव्हा त्या यज्ञाची हकीकत वाल्मिकींनी त्याला ऐकवली, ती अशी ...

इक्ष्वाकू कुळात सुदास नावाचा राजा होऊन गेला. त्याचा पुत्र वीरसह. तो राजपुत्र वनात शिकार करण्यासाठी गेला असताना तेथे सतत रुप बदलून वावरणाऱ्या दोन राक्षसांची हकीकत त्याला कळली. हे राक्षस वाघाचं रुप धारण करुन अनेक मृग मारुन खात. त्यामुळे ते वन मृगाशिवाय उजाड होत चाललं होतं. सुदासपुत्रानं त्यातल्या एका राक्षसाला शिकारीत मारुन टाकलं. दुसरा राक्षस मग सूडाच्या भावनेने वावरु लागला.

पुढे हा सुदासपुत्र यथाकाल अयोध्येचा राजा झाला. अश्वमेध यज्ञाचे त्याने अनुष्ठान केले. तेव्हा हा दुसरा राक्षस वसिष्ठांचं रुप घेऊन अवतरला राजाला म्हणाला, "राजन, आज यज्ञसमाप्तीचा दिवस आहे. तरी तुम्ही मला मांसयुक्त भोजन द्या." राजाने पाकगृहातील कुशल आचाऱ्यांना बोलावले व स्वादिष्ट मांसयुक्त भोजन शिजवण्यास सांगितले, परंतु तेव्हा त्या दुसऱ्या राक्षसाने पुन्हा रुप पालटले. स्वतःच आचारी बनून मनुष्याच्या मांसाचे भोजन बनविले व ते राजाच्या हाती देत म्हटले, "आपल्या आज्ञेप्रमाने हे मांसयुक्त अन्न घेऊन आलो आहे. ते मोठे स्वदिष्ट आहे." राजाने ते मांसयुक्त भोजन राणीसह जाऊन वसिष्ठांसमोर ठेवले. ते मांसयुक्त भोजन पाहून वसिष्ठ संतापले व त्यांनी राजाला शाप दिला, "तू मला मानवी मांसाचे भोजन देत आहेस, तर तूही मनुष्यभक्षी राक्षस होशील !" त्यावर राजा संतापला व त्यानेही मंत्रजल उचलले व वसिष्ठांना शाप देण्याचा प्रयत्न केला; परंतु राणीने त्याला आवरले व म्हटले, "राजन, वसिष्ठ आपले सन्माननीय अतिथी व यज्ञाचे पुरोहित आहेत. त्यांना शाप देणे उचित नाही तो निष्फलही ठरेल!" त्यावर राजाने ते अभिमंत्रित शापजल स्वतःच्याच पायावर शिंपडले. त्याबरोबर त्याचे दोन्ही पाय ठिपक्याठिपक्याचे झाले. सुदासपुत्र राजा सौदास तेव्हापासून 'कल्माषपाद' म्हणून ओळखला जाऊ लागला. वस्तुस्थिती कल्माषपादाच्या लक्षात आली. पत्नीसह राजा वसिष्ठांकडे गेला. त्यांना प्रणाम





करुन व वारंवार त्यांची क्षमा मागून तो म्हणाला, "ब्रह्मर्षी, तुमचंच रुप धारण करून यज्ञमंडपात कुणीतरी राक्षस आला आणि हे मांसभोजन तयार करण्यास मला प्रेरित केलं." तेव्हा वसिष्ठांचे मन थोडे शांत झाले. त्यांनी राजाला उःशाप दिला, "बारा वर्षे पर्यंत तुला माझ्या शापाचे फळ भोगावे लागेल. त्यानतंर तू शापमुक्त होशील !"

ज्या रात्री शत्रुघ्नाने वाल्मिकी ऋषींच्या पर्णशाळेत प्रवेश केला, त्याच रात्री माता सीता प्रसूत झाली. तिला दोन मुले झाली. ती जुळी मुले होती. महर्षी वाल्मिकींनी त्या तान्ह्या मुलांना काही बाधा होऊ नये म्हणून काही रक्षणव्यवस्था केली.

ब्रह्मर्षी वाल्मिकींनी एक मूठभर कुशगवत व एक मूठभर लवलोकर घेतली. ते त्या साधनांसह दोन तान्ह्या बालकांपाशी गेले. तिथल्या वृध्द सुईणींना त्यांनी सूचना केली, वृध्द स्त्रियांनो प्रथम जन्मलेल्या मुलाला मंत्रसंस्कार केलेल्या या कुशानं मार्जन करावं. त्या बालकाचे नाव कुश राहील. नंतर जन्मलेल्या मुलाला लवानं मार्जन करावं. त्यामुळे त्याचे नाव लव राहील.

त्यामुळे ब्रह्मर्षी वाल्मिकींमुळे या दोन आवळ्याजावळ्या मुलांचे नाव कुश व लव असे झाले. शत्रुघ्नाला जेव्हा ही आनंदाची वार्ता कळली, तेव्हा मोठ्या आनंदाने त्याने आंतरआश्रमात माता सीतेची भेट घेतली. तिच्या मुलांचे मुखदर्शन घेतले. यमुनातटावरच्या वास्तव्यात एका गप्पागोष्टीत राजा असताना शत्रुघ्नाने च्यवनमुनींना लवणासुराविषयी विचारले. तेव्हा लवणासुराने शूल शक्तीच्या आधारे राजा मांधाताच्या हत्येची हकीकत त्याला कळली.

क्रमशः

❖❖❖



कथा :

# संस्कारांचं महत्व

उन्हातान्हात भटकत राजू शेवटी एका ऑफिसमध्ये पोहोचला. आज तो पहिल्यांदाच मुलाखतीसाठी आला होता. घरातून निघताना तो विचार करत होता की, जर ह्या मुलाखतीत पास झालो तर शहरात नवीन घर घ्यायचं. आई-बाबांची रोजची कटकट, तेच तेच बोलणे. ह्यापासून आपली सुटका होईल. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत त्यांची जी कटकट चालते त्यामुळे खूप वैतागलोय. कंटाळा आलाय मला रोजरोज तेच ऐकून. सकाळी झोपेतून उठलो की आधी अंथरुण पांघरुण घडी करा. निटनेटके ठेवा. मग बाथरुमला जा. बाथरुममधून बाहेर आलो की आई आवाज देते नळ बंद केला का? टॉवेल जागेवर ठेवला की फेकला इकडे तिकडे?

नाश्ता करुन घरातून निघताना पण बाबांचा करडा आवाज, पंखा बंद केलास का? की चालूच

आहे ? काय काय ऐकायचे ? ही नोकरी मिळली ना तर घर सोडून देईन. विचाराच्या तंद्रीतच तो ऑफिसमध्ये शिरला. ऑफिसमध्ये बरेच उमेदवार मुलाखतीसाठी बॉसच्या बोलवण्याची वाट पाहत बसले होते.

बारा वाजले होते. त्याने पाहिले ऑफिसच्या व्हरांड्यात लाईट अजून चालूच होती. तेवढ्यात आईची आठवण आली. त्याने लगेच जाऊन लाइटचे बटन बंद केले. ऑफिसात ठेवलेले वॉटर कूलरचे पाणी थेंब थेंब गळत होते. बाबांचे रागवणे आठवले. आणि लगेच त्याने वॉटर कूलरचा कॉक व्यवस्थित बंद केला. पुढे निघाला तर एक खुर्ची रस्त्यातच होती ती बाजूला ठेवली आणि वर गेला. बघतो तर एकएक उमेदवार मुलाखतीला आत जातो व लगेच बाहेर येतो. त्याने माहिती काढली तेव्हा त्याला काळलं की बॉस फाईल घेतात काही न विचारताच बाहेर पाठवून देतात. राजूचा नंबर आल्यावर त्याने मॅनेजरकडे फाईल सरकवली. कागदपत्रांवर नजर टाकत त्यांनी राजूला विचारले, "केव्हा कामावर हजर होणार आहेस ?" त्यांच्या ह्या प्रश्नाने तो आश्चर्यचकीत झाला. त्याला वाटलं ते चेष्टा करत आहेत. ते त्याच्याकडे बघत म्हणाले, "ही चेष्टा नाहीये, खरंच विचारतोय."

"आजच्या मुलाखतीत मी कोणालाही काही विचारले नाही. फक्त सी.सी.टी.व्ही. मध्ये प्रत्येकाचे वागणे आणि हालचाली बघीतल्या. सर्वजण आले; पण कोणीही नळ व लाईट बंद केली नाही. धन्य आहेस तू आणि तुझे आईवडील, ज्यांनी तुला इतके छान संस्कार लावले आहेत.

खरं म्हणजे ज्या माणसाला स्वत:लाच शिस्त नाही भलेही तो हुशार व चतुर असला तरी व्यवस्थापन आणि जीवनाच्या धावपळीत तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही." राजू भारावल्यासारखा घरी पोहचला. आईबाबांना त्याने कडकडून मिठी मारली आणि त्यांची क्षमा मागत त्यांना धन्यवाद दिले. आईबाबांना कळेना. राजूने त्यांना सगळी हकीकत सविस्तर सांगत म्हटले, "आई-बाबा तुम्ही मला छोट्या छोट्या गोष्टींसाठी रागावलात, चिडलात पण त्यामुळे मी जे शिकलो त्याच्या बदल्यात माझ्या पदवीची काहीच किंमत नव्हती. तेव्हा कळलं की नुसतं शिक्षण आणि पदवी असून चालत नाही तर जीवनात सभ्यता आणि संस्कारही खूप आवश्यक आहेत."

मित्रांनो, या जगात जीवन जगण्यासाठी संस्कार गरजेचे आहेत. संस्कारासाठी आई-वडिलांचा आदर सत्कार करणं हेही तेवढंच महत्वाच आहे.

- रश्मी थोरात

❖❖❖



# दादाला विचारू या

प्रश्न : ब्रह्मज्ञान देताना तन-मन-धन ईश्वराचं आहे, ते ईश्वराचं मानायचं आहे असं वचन आपल्याकडून का घेतलं जातं ?

उत्तर : ब्रह्मज्ञान हे मुक्तीसाठी प्राप्त केलं जातं. मुक्ती ही देह सोडल्यानंतरची गोष्ट नसून देहात असतानाच साधावयाची बाब आहे.मुक्तीसाठी आसक्ती कमी करणं गरजेचं आहे. देह आणि देहाशी संबंधित गोष्टी मुख्यत: आसक्तीसाठी पर्यायाने बंधनात टाकण्यासाठी कारणीभूत ठरतात. वास्तविकता तर हीच आहे, की जोपर्यंत जीवात्मा देहात आहे तोपर्यंत देह चालतो, बोलतो परंतु जीवात्मा देहातून निघून गेल्यावर देह देखील इथंच ठेवावा लागतो. मान सन्मान, धन - दौलत, नाते-गोते यांचा काहीच उपयोग नसतो. जर जीवात्म्याला मुक्त व्हायचं हे सत्य असेल तर देहाशी संबंधित गोष्टीत त्याला अडकवणं कितपत योग्य ठरेल ? जीवात्म्याने मुक्ती साधावी यासाठीच देह मिळाला आहे. ईश्वराने त्याच गोष्टीसाठी दिलेलं आहे ही जाणीव सतत राहावी जीव आसक्तीत पडू नये यासाठी हे वचन घेतले जाते.

❖ ❖ ❖

प्रश्न : सत्संग का करावा ?

उत्तर : सत्संग म्हणजे सत्याचा संग. सत्य म्हणजे ईश्वर. सत्याची चर्चा, गुणगान सत्संगातच होत असते. सत्संगात गेल्याने सेवा आणि नामस्मरण घडते. आपण जर विचार केला, की घरीच बसून रेकॉर्ड केलेले विचार ऐकावेत, कशाला सत्संगात जायचे ? परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे की जसं शाळेत शिकवलेला विषय घरी अभ्यासून पूर्णपणे समजतोच असं नाही त्यासाठी शाळेतच गेलं पाहिजे. सत्संगाच्या पवित्र वातावरणाचा परिणामही आपल्या मनाला पवित्र बनवत असतो.

ब्रह्मज्ञान घेतल्याने ईश्वराचा बोध होतो. पण ईश्वराला हृदयात, जीवनात धारण केवळ सत्संगानेच करता येते. ‘बिनु सत्संग विवेक न होई’ असं म्हटलय. म्हणजे योग्य अयोग्य समजून योग्य ते निवडण्याची स्वीकारण्याची बुध्दी प्राप्त होते. आपल्यातले अवगुण, कमतरता कमी होतात. जीवन जगण्याची योग्य दिशा प्राप्त होते. म्हणून सत्संग करावा. श्रवण केलेल्या विचारावर मनन-चिंतन करावे.

❖ ❖ ❖

प्रश्न : नामस्मरण व जप यात काय फरक आहे ?

उत्तर : नामस्मरण याचा अर्थ जो नामी (परमात्मा) आहे. त्याची ओळख किंवा जाणीव सद्‌गुरुकडून झाल्यानंतर त्याच्याच जाणीवेत राहणे याला नामस्मरण म्हटले आहे. नामीच्या नावाचे (मंत्राचे) रटन म्हणजे नामस्मरण नाही. नाममंत्रामुळे परमात्म्याच्या अस्तित्वाची जाणीव जरुर होते आणि ती जाणीव होणे गरजेचे आहे नाममंत्रासोबत परमात्म्याची जाणीव झाली नाही तर तो केवळ नामाचा जप होईल. जप करणारे नामाचं उच्चारण मोठ्याने, हळू किंवा मानतल्या मनात करत असताना त्यांना जर परमात्म्याची जाणीव असेल तर स्मरण आणि जप यात काहीच फरक राहत नाही.

ब्रह्मज्ञान नसताना केलेला नामाचा उच्चार हा केवळ जप असतो. नामस्मरणाने ईश्वराची अनुभूती होत राहून दैवी गुण अंगी येऊ लागतात.

❖ ❖ ❖

# आचार्य विनोबा भावे

( ११ सप्टेंबर १८९५ - १५ नोव्हेंबर १९८२ )

आचार्य विनोबा भावे यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी जिल्हा रायगड तालुका पेण मधील गागोदे गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नरहरी व आईचे नाव रखूमाई असे होते. आचार्य विनोबांचे नाव विनायक असे होते.त्यांना आणखी तीन भाऊ व एक बहिण होती. त्या तीन भावांची नावे बाळकृष्ण, शिवाजी व दत्तात्रय अशी होती. त्यांचे आजोबा शंभुराव भावे यांचा जन्म वाई (सातारा) येथे झाला. वाईमधील ब्राह्मणशाही मोहल्ल्यात ते राहत असत त्यांनी अग्निहोत्र स्वीकारले होते. त्यानंतर त्यांनी निराळी अग्निहोत्र शाळेची स्थापना केली. सर्व घराणे पूर्वीपासून धार्मिकवृत्तीचे असल्यामुळे आजोबा शंभुराव व मातोश्री रखुमाबाई यांच्याकडून त्यांना जणू धर्मपारायणाचे बाळकडूच मिळाले. त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी ब्रह्मचर्य व्रत धारण केले. त्याप्रमाणे त्यांच्या तीनही बंधूनी ब्रह्मचर्य व्रत धारण केले होते.



नरहरी भावे यांना नोकरी निमित्ताने बडोद्याला जावे लागले. त्यामुळे विनोबाजींचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोद्यालाच झाले. १९१६ साली ते इंटरची परीक्षा देण्यासाठी मुंबईला निघाले परंतु ते मध्येच सुरतला उतरले आणि तिथून ते वाराणसीला पोहचले. तिथे हिंदू विश्वविद्यालयात एक कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाला महात्मा गांधीजींचे भाषण आहे असे समजताच विनोबाजी गांधीजींचे भाषण ऐकायला गेले. त्या भाषणाचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि ते ७ जून १९१६ रोजी गांधीजींना प्रत्यक्ष भेटले. गांधीजींचे विचार, तत्व त्यांना पटल्यामुळे त्यांनी तिथेच जीवन साधना सुरु केली.

वाईला जाऊन त्यांनी केवलानंद सरस्वती यांच्याकडून उपनिषदे, ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य, पतंजली योग सूत्रे इत्यादी विषयांचे अध्ययन केले. फेब्रुवारी १९१८ साली ते वाईवरुन ते बडोद्याला आले. त्यावेळी बडोद्याला एन्फ्युएंझाची साथ चालू होती. त्या साथीमध्ये आई, वडिल व एक भाऊ हे तिघेही आजारी पडली. त्यात आई व भावाचा मृत्यू झाला. वडिलांची तब्बेत ठीक झाली. आईचे अंत्यसंस्कार वडील मुलगा असल्यामुळे विनोबांना करण्यास सांगितले परंतु कर्मकांड करणे पसंत नसल्यामुळे विनोबा त्या अंत्यसंस्काराला गेलेच नाहीत. मग ते संस्कार वडिलांनी केले. १९३० ते १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांना तुरुंगवास झाला. ही शिक्षा त्यांना धुळे येथील कारागृहात भोगावी लागली. रविवारच्या दिवशी ते कैद्यांना एकत्र बोलावून गीतेवर प्रवचन देत असत. त्यांच्या प्रवचनासाठी १०० कैदी उपस्थित राहात असत. १९४० साली गांधीजींनी स्वराज्याकरता वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन आरंभले. त्यात पहिला 'वैयक्तिक सत्याग्रही' म्हणून विनोबांची निवड करण्यात आली.

त्यांनी भूदान यज्ञ चालवून अनेक लोकांना जमिनींचे वाटप केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत जमिनदारांकडून लाखो एकर जमीन घेऊन ज्यांना जमिनी नव्हत्या त्यांना जमिनी दान दिल्या. समाजाच्या हितासाठी प्रत्यक्षरुपाने केलेली ही त्यांची कामगिरी मोलाची होती. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अष्टदशी (सार्थ), ईशावास्यवृत्ती, उपनिषदांचा अभ्यास, गीताई, गीताई चिंतनिका, गीता प्रवचने, गुरुबोधसार (सार्थ), जीवनदृष्टी, भागवतधर्म सार, मधुकर, मनुशासन, लोकनीती, विचारपोथी, साम्यसूत्र वृत्ती, साम्यसूत्रे, स्थितप्रज्ञ दर्शन अशी अनेक पुस्तके लिहिली.

अशी ही महान विभूती १५ नोव्हेंबर १९८२ रोजी काळाच्या पडद्या आड झाली.

❖ ❖ ❖



# विचारपुष्प



आमचा आत्मा या परमात्म्याचाच अंश आहे. जोपर्यंत परमात्म्याला जाणले नाही, तोपर्यंत हे ज्ञान आमच्या मनामध्ये वसू शकत नाही. ब्रह्मज्ञान घेतल्यानंतरही आपल्या मनामध्ये काही फरक पडतो की नाही? आपण कुठे उभे आहोत याचा आपल्या मनाशीच विचार करुन पाहा. आम्हाला ज्ञान समजले आहे अथवा नाही? जर समजले असेल तर ते जीवनात आपल्या सोबत राहील. हे गुण स्वभावात उतरले म्हणजे मग माणूस माणसासारखा वागू लागेल. मग ते मानवी गुण आमच्यामध्ये आपोआपच

प्रवेश करतील.

निरंकार सदोदित आमच्या समवेत आहे, निरंकारच आम्हा सर्वांमध्ये विद्यमान आहे, ही जाणीव जर राहील तर मग आपण कोणाकडे वाईट नजरेने पाहणार नाही, कोणाला वाईट बोलणार नाही, कोणाचे वाईट चिंतणार नाही. आपल्याला इथे जाणीवही होत होती की, आपण जीवनात काय बनायचे आहे? जर गरमी असेल तर आपण थंड हवेची झुळूक बनून सर्वांना शीतलता द्यायची आहे. अशा प्रकारे आपण आपल्या मनाला शीतल ठेवू शकतो. दुनियेतील चढ–उतार त्यांच्या गतीने चालतच राहतात; तथापि, आपण स्वतःला शीतल ठेवायचे आहे आणि आपल्या बोलांनी व कर्मांनी इतरांवरही या शीतलतेचा वर्षाव करायचा आहे.

जग क्षणभंगूर आहे ही बाब आपण सदोदित ध्यानात ठेवावी. केवळ हा परमात्माच आहे जो आधीही होता आणि पुढेही राहणार आहे. भौतिक दृष्टीने ही माया जरी नष्ट झाली तरी हा परमात्मा (कायम–दायम) राहील. ज्याप्रमाणे आता पर्वतावर बर्फ दिसत आहे; पण हा बर्फ म्हणजे वास्तविक पाणीच आहे. जर बर्फच नसता तर पाणीही राहिले नसते. अशाच प्रकारे आपण म्हणतो की हा पानापानांत, डहाळी–डहाळीत रमलेला आहे, स्थित आहे; हाच आपली खरी ओळख आहे. अनेक काळापासून हा आत्मा कधी पशु योनिमध्ये तर कधी मानव योनिमध्ये अनेक शरीरे बदलत आला आहे. आता मनुष्य योनिमध्ये आलेला आहे तर त्याची कदर करावी. कारण जे इतर योनिंमध्ये अशक्य होते ते करणे आता शक्य आहे. आता आपण आपली वास्तविक ओळख करुन घ्यायला हवी. आपण केवळ हे शरीर नसून आत्मा आहोत जो एवढी वर्षे बंधनात होता. शरीर हेच माझे खरे रुप आहे असे हा आत्मा स्वतःला समजून बसला होता. मात्र, हे शरीर एक ना एक दिवस नष्ट होणार आहे; तेव्हा त्यानंतर आपली खरी ओळख हे ब्रह्मज्ञानच आहे. परमात्मा आणि आपल्या नात्याची खरी ओळख – कुठून आलो ? कशामध्ये जगत आहोत ? आणि शरीर पडल्यानंतर कुठे जायचे याचा बोध हेच ब्रह्मज्ञान होय. आपली भटकंती केवळ ब्रह्मज्ञानानेच दूर होऊ शकते. जेव्हा आपण प्रकृतीकडे पाहतो; वेगवेगळ्या वनस्पती आहेत, फुलांचे विविध रंग, आकार आणि सौंदर्याकडे जेव्हा आपली नजर जाते तेव्हा आतून हाच आवाज उमटतो की, प्रकृती किती सुंदर आहे! हा जो रचनाकार आहे, त्याची रचना आहे ही प्रकृती. या रचनेकडे पाहून आमच्या मनात कृतज्ञतेचा भाव उमटावा, आमचे डोळे सदैव याच्याप्रति कृतज्ञ असावेत.

❖❖❖

# शब्दकोडे १८२

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | ■ | २ | | ३ |
| | ■ | ■ | ४ | | ■ | |
| ५ | | ६ | ■ | ७ | | |
| | ■ | ८ | | | ■ | |
| ९ | १० | | ■ | ■ | ११ | |
| ■ | | ■ | १२ | १३ | | ■ |
| १४ | | १५ | ■ | | ■ | १६ |
| १७ | | | ■ | १८ | | |

## आडवे शब्द

१. आधी पोटोबा, मग .........(म्हण)
२. एक पौष्टिक पालेभाजी
४. या देशाने १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केले होते
५. हिरा हा ........ या मूळ तत्वापासून बनलेला आहे
७. घरा लगतचे
८. एक ऋतू
९. घटस्थापनेपासूनचा दहावा दिवस
११. आंतरराष्ट्रिय न्यायालय कोठे आहे ? (हेग / पुणे)
१२. या राज्याची राजधानी पाटणा आहे
१४. दादासाहेब फाळके पारितोषिक विजेती पहिली अभिनेत्री :........... राणी
१७. कपडा, वस्त्र याचा समानार्थी शब्द
१८. ५१ चे तीन समान भाग केले तर एक भाग किती ?

## उभे शब्द

१. नरेंद्र विश्वनाथ दत्त हे कोणाचे नाव आहे ?
२. १२ जुलै १९६१ रोजी कोणते धरण फुटून जलप्रलय झाला होता ?
३. नाभीमध्ये सुगंध असणारे एक हरिण
६. वर, पती
१०. जागतिक पर्यटन दिवस सप्टेंबर महिन्याच्या ........ तारखेला साजरा करतात.
११. शत्रूच्या गटातील माहिती गुप्तपणे काढणारा
१३. अमेरिकेच्या राष्ट्रपतीचे निवास स्थान : व्हाईट ...........
१४. मानला तर ......... नाही तर दगड (म्हण)
१५. पंचेद्रियांपैकी सत्संगात कोणतं इंद्रीय सर्वाधिक जागृत असावे ?
१६. सर्वात कठीण पदार्थ

उत्तरे इतरत्र

# देव माणसातला

येरे ये पावसा म्हणुनी, सारे करती पाणी पाणी
कुणास नाही कळले फिरेल, सर्वांवरती हे पाणी ।।ध्रु.।।

सुरु जाहला पाऊस जेव्हा, आनंदीत झाले सारे
दुष्काळ निवारण होईल, आणि पिकती शेत शिवारे
नकळत हे सारे घडले, नव्हते ध्यानी मनी ।।१।।

महापुराने जेव्हा असे हे, रौद्ररुप धारण केले
क्षणामध्ये सारेच्या सारे, छिन्न विछिन्न झाले
दु:खाचा डोंगर कोसळला, रडती धाय मोकलुनी ।।२।।

देव बुडाला देवळातला, घरातला नाही तरला
जागृत झाला देव परंतु, माणसा माणसातला
जो तो धाऊन आला अपुली, धर्म जात विसरुनी ।।३।।

इसाईत येशू अवतरला, हिंदूत राम हनुमान
वाहे गुरु शीखात प्रगटला, मुसलीमात रहिमान
वाचविले कितिकांचे प्राण, मानवतेचे रुप धरुनी ।।४।।

असाच तू मानवा सदैव, करशी दुसऱ्याचे कल्याण
स्वर्गरुप या धरतीसाठी, ठरशील तू वरदान
देव माणसामध्येच आहे, आले आज कळुनी ।।५।।

- सुरेश तिर्लोटकर











# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा







पिंट्याच्या मनात विचार आला की, या झाडावरचे आंबे काही दिवसांनी पिकून तयार होतील. म्हणून आपण इथे राहण्याची सोय केली पाहिजे.
पिंट्या लगेच उड्या मारत आंब्याच्या झाडावर चढला
"बंद कर तुझं हे गाणं, आज पासून हे झाड माझं घर आहे"
"पिंट्या भाऊ मी तर पहिल्यापासून इथेच राहते."
"मग दाखव तुझं घरटं कुठं आहे ते? सर्वांना माहीत आहे की तू आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात घालतेस."


पिंट्याच्या तोंडून असे शब्द ऐकताच कोकिळेला दुःख झाले. नाराज होऊन ती दुसऱ्या झाडावर जाऊन बसली.
"पिंट्या, तू कोकिळेला असं बोलायला नको होतं."
परंतु पिंट्याला त्याचा काहीच फरक पडला नाही.
"मी काय करावे ते तू मला शिकवू नकोस."


जंगलातील सर्व प्राणी पिंट्याचे बोलणे ऐकून नाराज झाले.
काही दिवसातच झाडावर आंबे पिकू लागले. पिंट्या आंब्यावर ताव मारु लागला.
काही दिवसात झाडावरचे आंबे पिकून संपले. झाडावरचे आंबे संपले. आता पिंट्या चिंतातूर झाला.
दुसरीकडे बाकिचे प्राणी मजेत इतर झाडांची फळे खात होते.
एके दिवशी भुकेने व्याकूळ झालेला पिंट्या सशाजवळ फळं मागण्यासाठी गेला.
ससुल्याने पिंट्याला आनंदाने पोटभर फळं खायला दिली. पिंट्याला स्वत:ची चूक समजली. त्याला पश्चाताप झाला. कोकिळेशी केलेल्या चुकीच्या व्यवहाराची त्याने ससुल्याजवळ क्षमा मागितली. पिंट्याला समजून चुकले की, आपण सारे मिळून मिसळून राहण्यातच भलाई आहे.
तात्पर्य :- आपण सर्वांनी मिळुन मिसळून राहिले पाहिजे.



कथा

# बलिदान नाही...योगदान

गोपाळपूर नावाचं एक गाव होतं. त्या गावात पाऊस कमी पडल्याने पाण्याचा दुष्काळ पडला. नदी,नाले, तलाव,विहिरी आटल्या होत्या.लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागे. पशू-पक्षी जनावरे हवालदील झाली होती.शेतातील उभी पिकं करपून गेली होती.

त्या गावाच्या बाहेर एक प्राचीन मंदिर होतं तेथे सहसा कोणी जात नसत.परंतु एके दिवशी त्या मंदिरात एक वृध्द संन्यासी थांबलेला असल्याचे गावकऱ्यांनी पाहिले. गावाची हालाकीची स्थिती त्याला सांगून आशीर्वाद घ्यावेत असा विचार करून गावचे पाटील काही लोकांना घेऊन दर्शनाला गेले. संन्याशाच्या चरणी डोकं ठेवत आपल्या गावावर ओढवलेल्या दुष्काळाच्या संकटावर उपाय विचारताना पाटील म्हणाले, "महाराज आमचं काही चुकलं का? देवाला कोंबडा -बकरा कापून बळी चढवावा लागेल का? मी माझा स्वत:चा बळी चढवायलाही तयार आहे; पण गावातला पाण्याचा दुष्काळ दूर होऊ दे." पाटील पाणावलेल्या डोळ्यांनी हात जोडत पुन्हा नतमस्तक झाले. वृध्द संन्याशाने पाटलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. क्षणभर डोळे मिटून ते ध्यानस्थ बसले नंतर सर्वांवर आपली प्रेमळ नजर फिरवत ते म्हणाले, "बंधूनो, बलिदानाची नाही तर तुमच्या योगदानाची गरज आहे. ईश्वर कृपेने तुमच्यावर ओढवलेलं संकट दूर होऊ शकतं; पण सर्वांनी मी सांगेन तसं केलं पाहिजे जर तुम्हाला मान्य असेल तर उद्या सकाळी पहाटे कुदळ, फावडी घेऊन इथं या". पाटलांनी हो म्हणत त्यांना पुन्हा दंडवत घातला आणि त्यांचा निरोप घेतला.

(पान २२ वर)



# मौल्यवान वस्तू

एक सम्राट होता त्याला आपल्या वैभवाचा, श्रीमंतीचा खूप गर्व होता. त्याला लोकप्रियता हवी होती. त्यासाठी तो प्रयत्न करीत होता; परंतु आपल्यापेक्षा गावाबाहेर आलेल्या एका भिक्षूला लोक जास्त मान देतात. त्याचे प्रवचन ऐकण्यासाठी आपली सारी कामे सोडून लोक जातात हे ऐकून त्याला आश्चर्ययुक्त मत्सर वाटू लागला.

तो स्वत: भिक्षूचे प्रवचन ऐकायला गेला. त्या भिक्षूच्या व्यक्तिमत्त्वाचा सम्राटावर खूप प्रभाव पडला. त्याने भिक्षूला आपल्या राजवाड्यात भोजनासाठी बोलावले. भोजन झाल्यानंतर सम्राटाने आपला राजवाडा फिरुन दाखवला. सर्व दालनातील मौल्यवान वस्तूंची माहिती तो भिक्षूला देत होता.

शेवटी तो भिक्षूला एका भव्य दालनात घेऊन गेला व म्हणाला, हे पाहा, येथे मी देशोदेशीची मौल्यवान रत्ने जमा करून ठेवली आहेत. अशी रत्ने आपल्याला कोठेही पाहायला मिळणार नाहीत. भिक्षू म्हणाला अरे वा ! तुम्हाला यातून खूपच उत्पन्न मिळत असेल ?

सम्राट हसून म्हणाला, उत्पन्न ? अजिबात नाही उलट त्यांच्या संरक्षणासाठी मला खूप खर्च करावा

लागतो. भिक्षू म्हणाला या दगडांपेक्षा मौल्यवान दगड तर मी आपल्या राज्यात पाहिले आहेत. चल दाखवतो.

भिक्षूचे बोलणे ऐकून चकीत झालेला सम्राट चटकन निघाला.थोड्या वेळातच दोघे गावाबाहेरच्या एका गरीब वस्तीत पोहचले. भिक्षूने एका झोपडीचे दार वाजवले. सम्राटाला एवढा मौल्यवान दगड इथे कसा असेल याचे आश्चर्य वाटत होते.

एका म्हातारीने दार उघडले. दोघे आत गेले. एका कोपऱ्यात बोट दाखवून भिक्षू म्हणाला ते पाहा मौल्यवान दगड. सम्राट चकीत होऊन म्हणाला, हे तर जाते आहे.

बरोबर, पण हे तुझ्या साऱ्या रत्नांपेक्षा श्रेष्ठ आहे. याच्यावर तिला काहीच खर्च करावा लागत नाही. उलट हे जातेच तिचे तिच्या कुटुंबीयांचे पोट भरते. मौल्यवान वस्तू तीच असते जिच्यापासून काही तरी प्राप्त होते.

राजा, जीवनाचे रहस्य त्यागात व पुरुषार्थात आहे. संग्रहाचा अर्थ आहे आपण ज्या समाजात राहातो त्याच्यावर अविश्वास दाखवणे. ज्यांचा लोकांवर विश्वास नाही त्याला लोक मान देत नाहीत.

हे ऐकून सम्राटाचे डोळे उघडले. त्याने आपली सारी संपत्ती जनहितासाठी दिली व त्यानंतर तो 'देवांना प्रिय' नावाने प्रसिध्द झाला.

मित्रांनो, तो भिक्षू म्हणजे भगवान गौतम बुध्द होते आणि ज्याला उपरती झाली तो सम्राट म्हणजे सम्राट अशोक होय.

❖❖❖

## बलिदान नाही...योगदान

(पान २० वरुन)

सकाळी वृध्द संन्याशाने मंदिराच्या पाठीमागे सर्वांना नेले आणि तेथे खोदकाम करायला सांगितले. दिवसभर श्रमदान करुन मोठा खड्डा खणला; परंतु तिथे पाणी काही लागले नाही. संन्याशी म्हणाला, "निराश होऊ नका उद्या सकाळी या. खोदायला सुरूवात करा." दुसऱ्या दिवशी सर्वांनी पुन्हा दिवसभर खोदकाम केले. खड्डा खोलवर गेल्यानंतर अचानक एका कातळाच्या फटीतून पाण्याचा मोठा कारंजा उडाला. सारे आनंदाने नाचू लागले. पाहता पाहता खड्ड्यात बरेच पाणी जमा झाले. लोकांनी ते पाणी गुरा-ढोरांना पाजले. झाडा - झुडपांना घातले . पुढे खड्ड्याभोवती पायऱ्या खोदून चहूबाजूने दगड लावून पाणवठा तयार केला. संन्याशी म्हणाला, "आता थांबायचं नाही. ठिकठिकाणी असे खड्डे खणायला सुरुवात करा. पाऊस पडण्याच्या आत डोंगर उतारावर चर खणा. पावसाचं पाणी नदी नाल्यातून वाहून जाता कामा नये. सगळे पाणी चर आणि खड्ड्यात जमा केले आणि जिरवले तर तुम्हाला वर्षभर पाण्यासाठी वणवण करावी लागणार नाही."

सगळ्यांनी संन्याशाच्या आदेशानुसार खड्डे आणि चर खणले. पुढे त्यांना कधीच पाण्याची चणचण भासली नाही.

मित्रहो, पाऊस पडणे, दुष्काळ दूर करणे यासाठी देवाला बळी देण्याची, नवस - सायास करण्याची गरज नाही तर मनापासून सर्वांनी एकत्र येऊन योगदान देण्याची गरज आहे. प्रयत्न, कष्ट, मेहनत करणाऱ्यांनाच देवाची साथ लाभत असते म्हणून गरज आहे... योगदानाची !

❖❖❖

# किती माझे प्रश्न

का नाही लागत आई पेरूला ही चिंच
का होत नाही मी माडा इतका उंच ?

कावळ्याला मिळावे मोराचे ते पंख
चिमणी सुध्दा व्हावी चांगली गरुडा इतकी उंच

वाट फुटेल तिकडे पळतात ढग सैरावैरा
उगाचच लुडबुडत असतो तिथे वारा

वीजांनाही नाही आई जरा पहा शिस्त
कडाडतात किती अन् छातीत होते धस्स

हे सारे प्रश्न मला सोडवायचे आहेत आई
त्यासाठीच तर आहे शाळेत जायची घाई

अभ्यासात घालीन डोके करीन संशोधन
या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधेल मन

आई म्हणे तूर्त आता शाळेला तू जा
सावकाश प्रश्न सारे सोडव मग राजा



–एस्.व्ही.पवार
नाशिक

# भाजीच नव्हे, तर औषधी असलेले कारले...

कारले ही फक्त भाजीच नसून दिव्यौषधीही आहे. कारली छोटी व मोठी अशी दोन प्रकारची असतात. मोठी कारली उन्हाळ्यात तर छोटी कारली पावसाळ्यात येतात. कारले थंड प्रकृतीचे असून, पचनास हलके असते. ते शरीरात वायू वाढवून पचन क्रिया प्रदिप्त करुन पोट साफ करते. कारले खाल्ल्यामुळे त्वचा स्वच्छ होते व कोणतेही पुरळ-फोड होत नाहीत.ते भूक वाढवते, विष्ठा शरीराबाहेर काढते. मूत्रमार्गही साफ ठेवते.




कारल्यामध्ये व्हिटामिन ए जास्त असल्यामुळे ते दृष्टीसाठी अत्युत्तम असते. रातांधळेपणा असल्यास यांच्या पानांच्या रसाचा लेप थोडीशी काळी मिरी मिसळून लावावा.

व्हिटामिन सी जास्त असल्याने हे शरीरात आर्द्रता राखते व तापातही फायदेशीर असते.

कारल्याची भाजी खाल्ल्यास बध्दकोष्ठता कधीही होत नाही. जर एखाद्याला बध्दकोष्ठता असेल, तर तीही नष्ट होते. याद्वारे ॲसिडिटी, छातीतील जळजळ व आंबट ढेकराच्या तक्रारीही दूर होतात. वाढलेले यकृत , प्लीहा व मलेरियाच्या तापातही हे फायदेशीर असते. यासाठी रुग्णाला कारल्याची पाने वा कच्ची कारली वाटून पाण्यात मिसळून पाजली जातात. या प्रयोगाने कावीळही बरी होते. रस काढण्यापूर्वी कारली व पाने स्वच्छ धुवावीत. सांधेदुखी व संधीवातात कारल्याची भाजी कडवटपणा न घालवता सकाळ, दुपार व संध्याकाळ खावी, फोड ,पुरळ, रक्तविकार यांसाठी कारल्याचा रस गुणकारी असतो. त्वचा, कुष्टरोग व मुळव्याधीत कारली मिक्सीत वाटून हलक्या हाताने प्रभावित जागी लेप लावावा. हा लेप नियमितपणे रोज रात्री लावावा. कारल्याचा रस चमचाभर साखर मिसळून प्यायल्यास रक्ती मुळव्याधीत फायदा होतो. कारल्याचा रस स्थूलता कमी करण्यासही मदत करतो. तसेच ज्या स्त्रीला मासिक पाळी त्रास व वेदनादायक होतं असेल, तिनेही कारल्याचा रस प्यावा. कारल्याच्या रसाने गर्भवती स्त्रियांमधील दुधाचे प्रमाण वाढते.

शरीराच्या ज्या भागात दाह होत असेल, तिथे कारल्याच्या पानांचा रस चोळावा. मधुमेहासाठी कारली वरदान आहेत. त्यांनी कारली जास्त खावीत. सकाळ-संध्याकाळ कारल्याचा रस प्यायल्यास रक्तातील साखर कमी होते. कारल्याचा रस पोटातील कृमीही नष्ट करतो. लोहाचे प्रमाण जास्त असल्यामुळे रक्ताल्पता (ॲनिमिया) ही दूर करतो.

# सुडौल बनवणारं नौकासन



या आसनामध्ये आपल्या शरीराचा आकार एखाद्या नौकेसारखा होतो. त्यामुळे याला नौकासन म्हणतात. या आसनाचे अनेक फायदे आहेत. लठ्ठपणा, बध्दकोष्टता, मधुमेह, भूक न लागणं, गॅस, अपचन असे पोटाचे अनेक विकार काही रुग्णांना सतावत असतात. या विकारांना दूर ठेवण्यात हे आसन मदत करतं. त्याबरोबरच जांघा, पोट, आणि कंबरेचे स्नायू यांना ताकद देतं. संपूर्ण शरीराचा रक्तपुरवठा सुरळीत होतो. तसंच हृदय आणि फुफ्फुसं यांना मजबुती देतं. शरीर सुडौल बनवून मज्जारज्जूंना स्वस्थ ठेवतं.

## काय काळजी घ्यावी?

हर्निया, पोटावर शस्त्रक्रिया झाली असेल किंवा आतड्यांमध्ये जखम असेल, पेप्टिक अल्सर असेल तर हे आसन करू नये.

## कसे कराल ?

पोटावर झोपा. आता दोन्ही हात सरळ समोर ठेवा. नमस्कार करतो तसे दोन्ही हात एकत्र करावे. दोन्ही पायही एकत्र राहतील. आता श्वास घेत हात आणि डोके वर उचला. त्याबरोबरच पायही वरच्या बाजूला उचला. हात आणि पाय जास्तीतजास्त वर उचलल्यानंतर श्वासोच्छवास सामान्य ठेवून, जेवढा वेळ शक्य आहे तेवढा वेळ आसनाच्या या स्थितीमध्ये थांबा. इथे शरीराची आकृती एखाद्या नावेप्रमाणे होईल. नंतर हळूहळू श्वास सोडत हात आणि पाय दोन्ही जमिनीवर आणा. दोन ते तीन वेळा हे आसन करा.

❖❖❖





# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



गोवर्धन पाटील



आरोही काळेगांवकर



आज्ञा मोहिते



कनिष्का खोपडे



अंतरा पाटील



अनोखी मोरे



प्रितिका गुजर



मंजिरी सावंत



प्रसाद आरवडे



रुद्र दवणे









सात्विक आरोटे



रुहान कनोजे



श्रेया भोसले



श्रेया कोतावडेकर



श्रावणी घोरपडे



स्वरा पाटील



वैदीक करडे



सुयश बोरकर



यज्ञेश निकम



रश्मिता चव्हाण



वेदान्त पाठक






# नगरधन

किल्ल्याचा प्रकार :- भुईकोट
जिल्हा :- नागपूर

नगरधन हा भुईकोट प्रकारातील एक किल्ला आहे. भारतातील महाराष्ट्र राज्याच्या नागपूर जिल्ह्यात असलेला हा किल्ला आहे. वाकाटकाकालीन असलेल्या या किल्ल्यास जुना इतिहास आहे. रामटेक पासून वायव्येस सुमारे ७ कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. इसवी सनाच्या चौथ्या शतकात ही जागा नंदीवर्धन म्हणून ओळखली जात होती. नगरधन हा त्याचा अपभ्रंश आहे. नगरधन गावाच्या पश्चिमेस या किल्ल्याचे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वाराचे वर मध्यभागी गणेशाचे शिल्प आहे. उमलती कमलपुष्पे हे यादवांचे चिन्ह प्रवेशाच्या दोन्ही बाजूस आहे. डाव्या बाजूस एक द्वारपालाचे शिल्प आहे. आत एक आयताकृती कक्ष आहे. येथे आत एक भुईकोट आहे. तो गोंड राजाचे वेळचा असावा. येथे एक पायऱ्याची विहीर आहे.

विदर्भातील रामटेक हे धार्मिक स्थळ म्हणून प्राचीन काळापासून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील भाविकांबरोबर इतर राज्यांमधूनही अनेक भाविकांचा ओघ रामटेकला असतो. रामटेकपासून सहा-सात किलोमीटर अंतरावर एक बलदंड भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला म्हणजे नगरधनचा किल्ला होय. रामटेकच्या प्रसिध्द अशा धार्मिक व पर्यटन स्थळाच्या जवळ असूनही नगरधनचा किल्ला मात्र अनेकांना अपरिचित आहे. रामटेकच्या डोंगरावरून नगरधनचा किल्ला ओळखू येतो. नगरधनचा किल्ला रामटेक तालुक्यात असून नागपूर जिल्ह्यामध्ये आहे. नागपूर ते जबलपूर असा राष्ट्रीय महामार्ग आहे. हा महामार्ग क्र. ७ आहे. या



महामार्गावर मनसर हे गाव आहे. या मनसर गावातून पश्चिमेकडे रामटेककडे जाण्यासाठी किंवा तुमसर (जि. भंडारा) कडे जाण्यासाठी रस्ता फुटतो. या रस्याने रामटेक गाठल्यावर तेथून सहा-सात किलोमीटर दक्षिणेकडे नगरधन गाव आहे. नगरधन गावाच्या बाहेर (गाव ओलांडल्यावर) नगरधनचा किल्ला आहे. नागपूरपासून वाहनाने दिडतासात आपण नगरधन पर्यंत पोहोचू शकतो. नगरधन हे पूर्वी नंदीवर्धन या नावाने परिचित होते. काही संशोधकांचे मत आहे. नगरधनचा भुईकोट हा प्रथमदर्शनी आपल्याला मोहवून टाकतो. नगरधन किल्ल्याने कात टाकून काळ्यारंगाची झाक असलेल्या चिऱ्यांनी किल्ल्याची तटबंदी व दरवाजा बांधून काढल्यामुळे त्याचे सौंदर्य कैकपटींनी वाढलेले आहे. नगरधनच्या भव्य दरवाजावर काही शिल्पे अलंकृत केलेली आहेत. शिरोभागी गणेशाची प्रतिमा आहे. दोन्ही बाजूंना चषक कोरलेले आहेत. दाराच्या बाजूला द्वारपाल कोरलेले असून त्यांच्या खांद्यावर कबूतर दाखवले आहे. पूर्वी निरोपानिरोपी करण्यासाठी कबूतरांचा वापर करीत असत. दाराच्या आत पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. पूर्वी आत येणाऱ्यांची चौकशी व झाडाझडती येथेच घेतली जायची. दारातून आत शिरल्यावर तटबंदीवर जाण्यासाठी पायऱ्यांचा मार्ग केलेला आहे. तटबंदीवर चढल्यावर आपण तटबंदीवरुन फेरी मारु शकतो. या रुंद तटबंदीवर निरीक्षणासाठी मनोरे केलेले आहेत. येथून रामटेक किल्ल्याचे दर्शन उत्तम होते. किल्ल्याच्या आत वाड्याचे तसेच इतर निवासस्थानांचे अवशेष आहेत. किल्ल्यामध्ये तीन मजली खोल विहीर आहे. या मजल्यावर कमानीयुक्त खोल्या असून पायऱ्या उतरून तिथपर्यंत पोहोचता येते. किल्ल्यामध्ये मंदिर तसेच काही ठिकाणी प्राचीन अवशेषही पहायला मिळतात. नगरधनचा किल्ला हा वाकाटक कालीन असल्याचे मानले जाते. म्हणजे साधारण चवथ्या शतकातील किल्ला असावा. जुन्या आणि नव्याचा संगम असलेला नगरधनचा भुईकोट.

❖❖❖

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न :- ई. सी. जी. म्हणजे नेमके काय ?

उत्तर :- ई. सी. जी. म्हणजे इलेक्ट्रोकार्डिओग्राम. याला आपण हृदयस्पंदनालेख असेही म्हणू शकू. आजकाल एखाद्या व्यक्तीला अचानक चक्कर आली, डोळ्यासमोर अंधारी आली वा छातीत धडधडले तर ई. सी. जी. काढून घेण्याचा सल्ला दिला जातो. चाळीशी ओलांडल्यानंतर दर दोन वर्षांनी ई. सी. जी. काढून घेणे श्रेयस्कर असेही म्हणतात. ई. सी. जी. काढण्याच्या या वाढत्या प्रमाणामुळे हृदयाबद्दलच्या जिज्ञासेमुळे, हृदयविकाराच्या भीतीमुळे आपल्याला ई. सी. जी. म्हणजे नेमके काय प्रकरण आहे हे जाणून घ्यायची जिज्ञासा असेल. ई. सी. जी. म्हणजे काय ? हे आता पाहू.

हृदयाच्या स्नायूंच्या आकुंचनप्रसरणात विद्युतलाटा वा विद्युतप्रवाह तयार होतात. याची नोंद शरीराच्या विविध भागांवर (छाती, पाय इ.) संवेदनशील असे इलेक्ट्रोड ठेवून करता येते. कारण हे विद्युतप्रवाह हृदयापासून सर्व ठिकाणी असे पसरविले जातात. या विद्युतप्रवाहाच्या शक्तीनुसार एका यांत्रिक उपकरणाच्या सहाय्याने हृदयाच्या स्पंदनाचा आलेख काढता येतो. ई. सी. जी. हे डॉक्टरांसाठी वरदानच ठरले आहे. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या हृदयस्पंदनालेखात P, Q, R, S व T या विद्युतलाटा (Waves) असतात. त्यांचे निरोगी लोकांसाठीचे आकार (उंची, रुंदी इ.) तसेच एकमेकांतील (त्या लाटांचे) अंतर ठरलेले असते. हृदयाच्या वेगवेगळ्या विकारावरुन या आलेखात बदल घडून येतात व त्यावरुन रोगाचे निदान करण्यात येते. हृदयाचा आकार, हृदयाची गती, जास्तीचे ठोके वा न पडणारे ठोके, हृदयातील जवनिका, कर्णिका या कप्प्यांमधील सुसंवाद, हृदयाच्या स्नायूंचा रक्तपुरवठा इ. अनेक गोष्टींची माहिती यामुळे मिळू शकते. हृदयविकाराचा झटका येण्यापुर्वी काही बदल ई. सी. जी.मध्ये सापडू शकतात. अशा व्यक्तींनी वेळीच आहार, विहार यावर नियंत्रण ठेवले तर पुढील अनर्थ टाळता येऊ शकेल. यावरुन ई. सी. जी. चे महत्त्व आपल्या लक्षात येईल. ई. सी. जी. काढण्यासाठी येणारा खर्च लक्षात घेता तो काढण्यापूर्वी खरेच तो काढण्याची गरज आहे काय, याचा साधकबाधक विचार तज्ज्ञांच्या सल्ल्याने करणे श्रेयस्कर ठरेल.

प्रश्न :- चंद्रावर गेल्यानंतर पृथ्वी कुठे दिसेल ?

उत्तर :- गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे आपण पृथ्वीच्या केंद्राकडे खेचले गेलेलो आहोत. यामुळे अंतराळात आपले स्थान कसेही असले तरी आपण पृथ्वीला (जमिनीला) आपल्या पायाखाली असल्याचे समजतो. याचप्रकारे आपण चंद्रावर असल्यास, चंद्रावरील गुरुत्वाकर्षण कमी प्रमाणात असले तरी चंद्रावरची जमीन आपल्या पायाखाली जाणवते. आणि जसे पृथ्वीवरुन चंद्राकडे पाहताना मान वर करावी लागते त्याचप्रमाणे चंद्रावरुन पृथ्वीकडे पाहताना मान वर करावी लागते. जरी आपण उलट असलो तरी पृथ्वी आपल्याला वरच दिसते.

प्रत्येक युगामध्ये अवतारी महापुरुषांच्या वचनांना मानणारे आणि न मानणारेही होऊन गेले. दोन्ही पैलू नेहमीच पहायला मिळाले. उदा. उजेड होता तसा अंधारही होता, थंडी होती तशी गरमीही होती. मनमतावर चालणारेही होऊन गेले आहेत. ते स्वतःच्या मतावर चालणारे अहंकार, संकुचितवृत्ती आणि स्वार्थाने जगत आले, ज्यामुळे वातावरण दूषित होते.

मार्ग तोच उत्तम आहे जो, प्रभू इच्छेमध्ये राहून समदृष्टीच्या भावनेने युक्त आहे, जो भिंती पाडण्याचे नाही तर उभारण्याचे काम करतो, जो राम आणि रहीममध्ये भेद करत नाही, जो जात-पात, मजहब (धर्म), रंग-वर्ण, प्रांतवाद, देशाच्या सरहद्दीच्या पलिकडे जाऊन 'वसुधैव कुटुंबम्'चीच दृष्टी देतो.

– युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज






बन्या : (लाह्या विकणाऱ्याला) काका, या लाह्या वाळूमध्ये एवढ्या तडतड करत का उडत आहेत ?

विक्रेता : तू या वाळूवर थोडा वेळ बसून बघ म्हणजे तुला कळेल हां !

विज्ञानाचे शिक्षक : मुलांनो,माझ्याकडे हा एक रुपयाचा कॉइन आहे. तो मी या ॲसिडमध्ये टाकतो. मला सांगा, तो विरघळणार की नाही ?

बंड्या : नाही विरघळणार !

शिक्षक : बरोब्बर; हे तू कसं ओळखलं ?

बंड्या : सोप्पय सर, जर हे नाणं विरघळणार असतं तर ते तुम्ही आमच्याकडून मागून घेतलं असतं. तुमच्या खिशातलं कशाला टाकलं असतं !

शिक्षक : बाळ्या, तू सांग बरं, एका शेतात शंभर मेंढ्या बसलेल्या आहेत. त्यापैकी पन्नास मेंढ्या उठून गेल्या तर किती मेंढ्या शिल्लक राहिल्या ?

बाळ्या : एकपण नाही.

शिक्षक : काय रे तुला एवढं सोपं गणित येत नाही ?

बाळ्या : मला येतं... पण मेंढरांना कुठं येतं गणित ? एक उठलं की सगळी एकामागोमाग जातात.




हवामानाचा अचूक अंदाज व्यक्त करणारे एक यंत्र शास्त्रज्ञ एका खेड्यात घेऊन आले व ते गावकऱ्यांना माहिती देऊ लागले.

हौसा काकू : सायेब, आमच्या गावात आज पाऊस पडणार आहे का ?

शास्त्रज्ञ : काकू, तुमच्या गावात कडक ऊन पडणार आहे.

काकू : बरं झालं बाई, मला पापड वाळत घालायचे आहेत.

बेरोजगार व्यक्ती : मालक, तुमची जाहिरात वाचून मी तुमच्याकडे कामाला आलो आहे.

मालक : तुला माझी अट माहीत आहे ना ? तुला पगार न देता फक्त दोन टाईम जेवण मिळेल, चालेल ना ?

व्यक्ती : होय, मालक मला मान्य आहे. पण मला काय काय करायचं आहे ?

मालक : रोज गुरुद्वारात जायचं तिथे दोन टाईम मोफत लंगर (भोजन) दिलं जात. तेव्हा तू रोज दोन माणसांचं भोजन घेऊन यायचं. एक तुझ्यासाठी आणि माझ्यासाठी, कळलं ?

एक चिमणी : (शेतात दाणे खात असताना) अगं पळ लवकर, तिथे बघ माणूस उभा आहे.

दुसरी चिमणी : नाही गं, बुजगावणं आहे ते !

पहिली चिमणी : तुला कसं कळलं ?

दुसरी चिमणी : त्याच्या हातात मोबाईल नाहीये.





समर्थ दर्शन : भाग - ५९

# थंडी छाटीत (उपरण्यात) ठेवली

समर्थांची स्वारी चाफळला असताना त्यांना हिवताप येऊ लागला. उपचार चालू होते. पण गुण नाही. एके दिवशी समर्थांना थंडीताप भरला, ते खोलीत निजले होते. इतक्यात शिवाजीमहाराजांची स्वारी दर्शनासाठी मठात आली. राजांना समर्थांच्या तब्ब्येतीबदल काहीच माहीत नव्हते. महाराज येताच कल्याणस्वामींनी खोलीत जाऊन शिवराय आल्याचे निवेदन केले. तेव्हा आत येऊ द्यावे अशी समर्थांनी आज्ञा केली व लागलीच आपल्या अंगावरील पांघरायची छाटी (उपरणे) काढून मांडीजवळ खाली ठेवली आणि आपण उठून बसले.

शिवाजीमहाराज नेहमीप्रमाणे प्रणिपात करून कुशलक्षेम कळवीत व विचारीत बसले. हे बोलणे चाललेले असताना समर्थांना थंडी वगैरे काही वाजत नव्हती. स्वस्थ बसले होते. इतक्यात राजांची नजर सहज जवळ असलेल्या छाटीकडे गेली. ती छाटी थडथड उडत होती. हा चमत्कार पाहून शिवाजीमहाराजांनी बाहेर येऊन कल्याणस्वामींना विचारले, की "छाटी उडत आहे. हा काय प्रकार आहे?"

तेव्हा कल्याणस्वामींनी "समर्थांना थंडीताप येत

(पान ३६ वर)



कथा

# अकबराला भेटला बिरबल

अकबराला शिकारीचा खूप नाद होता. एकदा तो सोबत घोडेस्वार आणि शिकारी घेऊन शिकारीला निघाला. घोडे पळत राहिले. घोड्यांच्या धावण्याच्या नादात फक्त मोजके सैनिकच अकबरासोबत पुढे आले. इतर सारेजण मागे राहिले.

संध्याकाळ झाली होती. सर्वजण भूकेले आणि तहानलेले होते. त्यातच आपण रस्ता चुकल्याचे अकबराच्या लक्षात आले. कोठे जावे तेच त्यांना समजत नव्हते. काही अंतर गेल्या नंतर एक चौक आला, पण त्या तीन रस्त्यांपैकी कोणत्या रस्त्याने जावे हेच कोणाच्या लक्षात येईना. तोच त्यांना रस्त्याच्या कडेला उभा राहून त्याच्याकडे रोखून पाहणारा एक मुलगा दिसला. सैनिकांनी त्याला पाहिले. त्यांनी त्याला पकडून अकबरासमोर आणले. अकबराने कडक शब्दात त्या मुलाला विचारले, ‘ए मुला, आग्य्राकडे कोणता रस्ता जातो ?’

मुलगा हसून म्हणाला, महाराज रस्ता चालू शकत नाही तर आग्य्राला कसा जाईल ? आग्य्राला

आपल्यालाच जावे लागेल. असे बोलून तो खळखळून हसला.

सारे सैनिक गप्प होते. त्यांना अकबराचा राग माहीत होता. मुलगा पुन्हा म्हणाला, महाराज, माणसे चालतात, रस्ता नाही.

ते ऐकून यावेळी अकबर हसला व म्हणाला, खरं आहे तुझं! तुझं नाव काय आहे? मुलांने उत्तर दिले, माझं नाव महेशदास, आपण कोण आहात?

अकबराने आपल्या बोटातील अंगठी काढून महेशदासला दिली व तो म्हणाला, तू महाराज अकबर, हिंदुस्थानच्या सम्राटाशी बोलत आहेस. मला निर्भीड माणसे आवडतात. तू माझ्या दरबारात ये आणि मला ही अंगठी दाखव. अंगठी पाहून मी तुला ओळखेन. आता मला मी कोणत्या रस्त्याने गेल्यास आग्र्याला पोहोचेन ते सांग! महेशदासने आग्र्याचा रस्ता सांगितला. सम्राटाला जाताना तो पाहत राहिला. हा महेशदासच नंतर बिरबल म्हणून ओळखला जाऊ लागला व अकबराच्या गळ्यातील ताईत झाला.

❖❖❖

परमपिता परमात्म्याला जाणल्यानेच विश्वशांती संभव आहे. महापुरुषांच्या, गुरुंच्या, अवतारांच्या पदचिन्हांवरुन चालल्याने कल्याण संभव आहे. मानवतेला आध्यात्माच्या आधारेच वाचवले जाऊ शकते.

जी वाणी मानवाला मानवाशी जोडण्याचे कार्य करते, माणसाच्या मनात एकदुसऱ्या विषयी प्रेम निर्माण करते, बंधू-भाव आणि नम्रतेची भावना प्रगट करते तीच खरी वाणी आहे.

## थंडी छाटीत (उपरण्यात) ठेवली

(पान ३४ वरुन)

आहे व आपण आलात म्हणून थंडी छाटीत ठेवून समर्थ आपल्यापाशी बोलत आहेत." असे सांगितले.

हे ऐकून महाराजांनी आत जाऊन समर्थांना विनंती केली, "छाटीत थंडी ठेवण्याइतके सामर्थ्य असताना देहाला कष्ट काय म्हणून द्यावे?"

समर्थ हसले आणि म्हणाले, "राजे, एखाद्या वेळी चालढकल केली तर चालेल. नेहमीच असा प्रकार केला तर सृष्टि-नियमाला बाधा येईल आणि देहभोग निर्माण केला आहे तो व्यर्थ होईल. याकरिता देहभोग सोसणे हेच योग्य."

क्रमशः

❖❖❖


## सारी ईश्वराची संतान (पान ४२ वरुन)

झाली तेव्हा सेवकाने राजपुत्राचा पुतळा कडेवर घेतला. तो बादशहाच्या समोर गेला तेव्हा त्याने पडण्याचे नाटक करून तो पुतळा तलावात पाडला. अकबराची नजर तलावाकडे जाताच त्याने धावत जाऊन तलावात उडी मारली, पण जेव्हा त्याला समजले की राजपुत्राचा पुतळा आहे तेव्हा अकबराने सेवकाला त्याचे कारण विचारले. तेव्हा तिथे बिरबल आला आणि म्हणाला, "हुजूर तुम्ही पाहिले की तुमचे तुमच्या पुत्रावर किती प्रेम आहे त्यामुळे तुम्ही स्वत: अनवाणी पायांनी त्याला वाचविण्यासाठी धावलात. तुम्ही सेवकांना बोलवू शकत होता." बादशहा अकबराच्या लक्षात आले की बिरबलाने त्याचे म्हणणे सिध्द केले आहे.

❖❖❖

# सत्कर्मयोगे वय घालवावे

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपल्या व्याख्यानात एक कथा सांगितली होती. ती अशी - एका सज्जन गृहस्थाला अनेक मित्र-नातेवाईक असतात. त्यापैकी तीन जण त्याचे जीवलग मित्र होते. त्यांच्यावर त्याचा खूप-खूप विश्वास होता. एकदा कुणीतरी खोटा आरोप करुन त्याच्यावर खटला दाखल केला. अचानक आलेल्या संकटामुळे तो अत्यंत भांबावून गेला. मदतीसाठी त्याला आपल्या तिन्ही मित्रांची आठवण झाली. पहिल्या मित्राकडे जाऊन त्याने मदतीची याचना केली. त्यावर मित्र म्हणाला, "मी तुला फक्त न्यायालयापर्यंत सोबत करु शकतो; पुढे तू तुझं बघून घे." निराश होत तो सज्जन दुसऱ्या मित्राकडे गेला. दुसरा मित्र म्हणाला, "मी न्यायालयाच्या पिंजऱ्यापर्यंत तुझी सोबत करु शकतो. तुला सोडवण्यासाठी मी प्रयत्न करीन; पण सोडविण्याची खात्री देऊ शकत नाही." त्यावर तो पुन्हा निराश होत तिसऱ्या मित्राकडे गेला. तिसरा मित्र त्याचे हसून स्वागत करत म्हणाला, "ये मित्रा! शांतपणे बैस. मी सदैव तुझ्यासोबत आहे. तुझ्या सुटकेसाठी मी पुरेपूर प्रयत्न करीन; पण जरी ते शक्य झालं नाही, तरी तुझी सोबत मी कधीच सोडणार नाही."



मित्रांनो, हे तीन मित्र कोण होते हे तुम्हाला जाणून घ्यायचय ना ? हे मित्र दुसरे तिसरे कोणी नसून ते आहेत 'धन, नातेवाईक आणि सत्कर्म.' प्रत्येकाला हे मित्र असतात. धन हे न्यायालयापर्यंत पोचविण्यापुरतंच मदत करु शकतं. नातेवाईक केसचा निकाल ऐकण्यासाठी, साक्ष देण्यासाठी आरोपीच्या पिंजऱ्यापर्यंतच येऊ शकतात; परंतु सत्कर्म मात्र सदैव माणसाच्या सोबत असतं. धनाचं आणि नातेवाईकांचं सामर्थ्य मर्यादित आहे; परंतु सत्कर्माचं सामर्थ्य अमर्यादित आहे.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, या विश्वात केलेलं कुठलंही कर्म व्यर्थ जात नाही. चांगल्या कर्माचं चांगलं फळ सुख; तर वाईट कर्मामुळे दु:ख-यातना वाट्याला येतात. त्यामुळे समर्थांनी म्हटलय - 'सत्कर्म योगे वय घालवावे.'

# किट्टी


चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




बरोबर बोललीस तू किट्टी बेटा! मुलांनो, स्वच्छतेमुळे आपले तन आणि मन दोन्ही निर्मळ होतात आणि स्वच्छ राहतात. तसेच परिसरातील वातावरण ही शुध्द राहते.
स्वच्छ भारत अ
स्वच्छ भारत
मॅडम, मी तर आपले घर अंगण तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याकडे विशेष लक्ष देते.
शाब्बास किट्टी ! मुलांनो, तुम्हाला सर्वांनाच माहीत आहे की आपले सरकार तसेच अनेक संस्था आपला देश स्वच्छ बनविण्यासाठी या अभियानात सामील होत आहेत.


हो मॅडम, मी टी.व्ही. वर याचा प्रचारसुध्दा पाहिला आहे. लोक झाडू घेऊन रस्त्यावरील कचरा काढताना स्वच्छता अभियानाचा प्रचार करत होते.
बरोबर आहे तुझं किट्टी. मुलांनो, आपण सर्वांनी ही गोष्ट स्वीकारली पाहिजे. कारण भारत आपला देश आहे. येथील प्रत्येक रस्ता व गल्ली-बोळ स्वच्छ करणे आपले कर्तव्य आहे.
बरोबर आहे तुमचं मॅडम !
हो मॅडम आम्ही सुध्दा या अभियानात सामील होऊन साफसफाई करु
फारचं छान मुलांनो ! आता पासून तुमचे सर्वांचे कर्तव्य आहे की, आपल्या आसपास कचरा जमा होऊ द्यायचा नाही. नेहमी कचराकुंडीचा वापर करायचा आहे. आणि हेही ध्यानात ठेवा की, कोणी आजूबाजूला घाण करत असेल तर त्याला मनाई केली पाहीजे.


मॅडम, याबरोबरच आम्ही आमच्या वस्तीत जाऊन लोकांना या स्वच्छतेचे काय फायदे आहेत ते सांगू.
खूप खूप छान मुलांनो, तसे पहायला गेलं तर स्वच्छतेमुळे आपण निरोगी राहतो. घाणीमुळे आजारपण येते.
बरोबर आहे मॅडम स्वच्छता असेल तर आपण निरोगी राहू.



# सारी ईश्वराची संतान

बादशाह अकबर एकदा बिरबलाला म्हणाले, "मी असं ऐकलं आहे की, एकदा श्रीकृष्ण हत्तीचे ओरडणे ऐकून त्याला वाचविण्यासाठी एकटेच पायी गेले होते? असं का? ते त्यांच्याबरोबर नोकर-चाकर घेऊन जाऊ शकत होते, रथातून जाऊ शकत होते." "जहाँपनाह तुमचं म्हणणं बरोबर आहे. श्रीकृष्ण रथातून जाऊ शकले असते पण भक्ताची हाक ऐकून त्यांना राहवलं नाही त्यामुळे ते अनवाणी धावत गेले. खरं तर देवाचे सर्व भक्तांवर सारखे प्रेम असते. त्यांना वाचविण्यासाठी ते धाव घेतात." अकबराला ही गोष्ट पटली नाही. तो म्हणाला "तू ही गोष्ट सिध्द करु शकतो का?" बिरबल हो म्हणाला.

दुसऱ्या दिवशी बिरबलाने बादशाहच्या मुलाचा पुतळा तयार केला आणि बादशहाच्या सेवकाला सांगितले, "आज संध्याकाळी जेव्हा बादशहा येईल तेव्हा तो पुतळा तलावात पडेल असा ढकलून दे. या कामाचा तुला योग्य तो मोबदला मिळेल." बिरबलाने सांगितल्याप्रमाणे सेवकाने केले. संध्याकाळी बादशहाची फेरफटका मारायची वेळ

(पान ३६ वर)

# सकारात्मक विचारांचा दृष्टिकोन


शाळेत असताना बहुतेक मुलांनी काही ना काही खोड्या केलेल्या असतात आणि ते वयसुध्दा खोड्या करण्याचच असतं हेही तितकंच खरं. त्याबद्दल शिक्षकांनी शिक्षाही दिलेली असते. काही खोडी न करता सुध्दा एखाद्या मुलाला शिक्षा झालेली असते. आता नियम आणि मुलांच्या भावनांच्या नावाखाली हे प्रमाण खूप कमी झाले. परंतु मागील पिढ्यांनी या शिक्षा देखील सन्मानपूर्वक स्वीकारुन एन्जॉय केल्या होत्या. त्या शिक्षांना सकारात्मकतेने घेतल्यास त्या जीवनात बरेच काही देऊन गेल्या असचं म्हणावं लागेल. एकंदरीत त्या शिक्षांमुळे खरे विद्यार्थी घडवले आहेत हे नाकारता येणार नाही. आजच्या शिक्षणात आणि पूर्वीच्या शिक्षणात जी तफावत दिसून येते त्याचे हे समर्पक उदाहरण आहे. आता हे सहज येईल की त्या शिक्षा म्हणजे जीवनातील मोठे धडे होते. उदाहणार्थ –

- बाकावर उभे रहा : याकडे अतिशय पवित्र बुध्दीने पहा. बाकावर उभे राहा म्हणजेच आयुष्यात मोठे पाहायला शिका असेच सांगितले जात असे.
- हात वर करुन उभे राहा : उच्च ध्येय ठेवा, उच्च पदापर्यंत पोहचा.
- भिंतीकडे तोंड करुन उभे राहा : स्वत:चे आत्मपरीक्षण करा.
- वर्गाबाहेर उभे राहा : निरीक्षणातून शिका, जगाचा दृष्टिकोन काय आहे ते समजू घ्या.
- वाकून उभे राहा : विनम्रता धारण करा.
- फळा पुसून स्वच्छ करा : विसरा आणि माफ करा. कोऱ्या पाटीवर नव्याने सुरवात करा.
- तोंडावर बोट : जास्त ऊर्जा खर्च करू नका
- कान धरा : वर्गात शिकवलेले लक्ष देऊन ऐका.
- पायाचे अंगठे धरुन उभे राहा : वागण्यात लवचिकता असू दया.
- एक ओळ पंचवीस वेळा लिहा : अचूक तेवढे वाटचाल करा.

आणि हो मुख्य गोष्ट सांगायची म्हणजे अशा प्रकारे भोगलेल्या शिक्षांची तक्रार मुलं आईवडिलांकडे करत नसत, त्यामुळे आईवडिल मुलाने केलेली तक्रार घेऊन शाळेत शिक्षकांना भेटायला येत नसत.

आणि त्याच बरोबर आणखी एक फारच चांगली असलेली गोष्ट सांगतो की आपल्या वर्गातील प्रत्येक मुलावर शिक्षक मनापासून प्रेम करीत असत मुलांनी कितीही खोड्या केल्या, त्यांना शिक्षा केल्या तरी शिक्षक कुठल्याही मुलाचा तिरस्कार करत नसत. वर्गात शिकत असलेल्या मुलांबद्दल त्यांची ही भावना असायची की माझ्या वर्गातील माझी मुलं सर्वच्या सर्व चांगल्या मार्कांनी पास झाली पाहिजेत. असे होते प्रेमळ शिक्षक. त्यामुळे शिक्षा केली तरी मुलं अशा शिक्षकांच्या संस्कारयुक्त शिकवणीचा आधार घेऊन जी मुलं त्यावेळी शिकली त्यांचे जीवन आजही ते चांगल्या प्रकारे जगत आहेत हे त्रिवार सत्य आहे आणि हा माझा स्वत:चा अनुभव आहे.

– सुरेश तिर्लोटकर






# परभणी

**मुख्यालय :** परभणी

**क्षेत्रफळ :** ६,५११ चौ.कि.मी.

**तालुके :** परभणी, जिंतूर, गंगाखेड, पूर्णा, मानवन, सेलू, सोनपेठ, पाथरी, पालम.

**सीमा :** पूर्वेस – नांदेड व हिंगोली जिल्हे,
दक्षिणेस – लातुर व बीड जिल्हे
पश्चिमेस – बीड व जालना जिल्हे
उत्तरेस – हिंगोली जिल्हा.

**नद्या :** गोदावरी ही प्रमुख नदी, पुर्णा, दुधना व कापरा.

**प्रमुख शेतकी उत्पादने :** मुख्य पीक ज्वारी, गहू, कापूस, गळिताची धान्ये, ऊस, द्राक्षे, केळी.

**धरणे :** कापरा नदीवर व मासळी नदीवर.

**विशेष माहिती :**

प्रभावती देवीचे प्राचीन मंदिर परभणी शहरात आहे; त्यामुळे या शहराला परभणी हे नाव पडले, असे मानले जाते.

गंगाखेड येथे संत जनाबाईंची समाधी आहे.

परभणी शहरात मराठवाडा कृषी विद्यापीठ आहे.

१ मे, १९९९ रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन हिंगोली हा नवीन जिल्हा निर्माण केला गेला. हिंगोली हा मराठवाड्यातील आठवा जिल्हा होय.

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यात लमाणांचे तांडे आढळतात.

**पूर्णा :** पूर्णा नदीच्या काठावरील तालुक्याचे ठिकाण, मनमाड-काचीगुडा लोहमार्गावरील रेल्वे जंक्शन, येथून जवळच कंठेश्वर या गावी पूर्णा व गोदावरी नद्यांचा संगम होतो.

**ताडकळस :** कापूस संकलन केंद्र आणि जिनिंग व प्रेसिंग कारखाना

**जिंतूर :** जवळच्या परिसरातील गुहांमध्ये जैन शिल्पे.

❖❖❖



# किकबॉक्सर - दिपाली पवार




पोलीस भरतीसाठी प्रयत्न करताना त्यासाठी लागणाऱ्या फिटनेससाठी म्हणून दीपाली पवार किकबॉक्सिंग या खेळाकडे वळली. पण, तोच तिच्या जीवनातला टर्निंग पॉइंट ठरला. पालघर जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातून आलेल्या या तरुणीची किकबॉाक्सिंगमध्ये प्रगती सुरु असून, तुर्कस्तानमध्ये नुकत्याच झालेल्या एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही तिनं उल्लेखनीय कामगिरी करुन दाखवली. या खेळामध्ये तिनं विद्यापीठ, राज्य तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही काही पदकांची कमाई केली आहे. विशेष म्हणजे प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मिळवत असलेल्या या यशामुळे तिचं कौतुक होतयं.

दीपाली पालघरच्या सोनोपंत दांडेकर कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्षाला शिकणारी विद्यार्थिनी होती. तिच्या घरची परिस्थिती तशी बेताचीच. घरी चार भावंड. दीपालीला लहानपणासून खेळाची आवड होती. घरातून तिला प्रोत्साहन मिळायचं. किकबॉक्सिंगमध्ये तिनं विद्यापीठ स्तरावर रौप्यपदक मिळवलं आहे. गेल्या वर्षी राज्यस्तरीय चॅम्पियनशिप स्पर्धेत तीन सुवर्णपदकं, नॅशनल फेडरेशन कपमध्ये सुवर्णपदक, सीनिअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक, जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक अशी चमकदार कामगिरी तिच्या नावावर आहे.

नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत जिंकल्यावर तिला तुर्कस्थानला जाण्याची संधी मिळाली. तिथे झालेल्या चौथ्या आंतरराष्ट्रीय खुल्या किकबॉक्सिंग युरोपियन कप स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीपर्यंत ती पोहोचली. यापूर्वीही तिला लंडन, रशिया या देशात होणाऱ्या स्पर्धांत जाण्याची संधी मिळाली होती. पण, केवळ आर्थिक कारणास्तव तिला तिथं जाता आलं नाही. तिचे प्रशिक्षक किशोर धोडी यांच्या मार्गदर्शनाखाली रोज सकाळी आणि संध्याकाळी ती सराव करते. दीपाली स्वत: क्लास चालवते. क्लासला येणाऱ्या मुलींची संख्या लक्षणीय आहे. या खेळात मुलांपेक्षा मुलींनाच जास्त रस असल्याचंही ती सांगते. या खेळात पुढे जाण्यासाठी तिला मदतीची गरज असल्याचं तिला मार्गदर्शन करणारी मंडळी सांगतात.

भारताची विक्रमी बॉक्सर मेरी कोम ही अनेक महिला बॉक्सिंग खेळाडूंप्रमाणेच दीपालीचीही आदर्श आहे. आयपीएस अधिकारी व्हायची दीपालीची इच्छा आहे.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१. अंतराळात प्रवेश करणारी पहिली भारतीय व्यक्ती कोण ?
अ) कल्पना चावला ब) राकेश शर्मा क) रविश मल्होत्रा ड) सुनीता विल्यमस्

२. १४ सप्टेंबर १८९४ रोजी कोणत्या उत्सवाचा प्रारंभ झाला ?
अ) शिवजयंती ब) दहीहंडी क) नवरात्रौत्सव ड) सार्वजनिक गणेशोत्सव

३. ययाति या कादंबरीसाठी कोणत्या लेखकाला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला ?
अ) वसंत कानेटकर ब) भालचंद्र नेमाडे क) वि.स.खांडेकर ड) कुसुमाग्रज

४. प्रकाश वर्ष हे कशाचे परिमाण आहे ?
अ) वेळ ब) अंतर क) वजन ड) प्रकाश

५. बेल्जिअमचा राष्ट्रीय प्राणी कोणता ?
अ) कांगारु ब) हत्ती क) वाघ ड) सिंह

६. बुद्धिबळाच्या खेळात एकूण किती प्यादी असतात ?
अ) १० ब) ८ क) १६ ड) १८

७. जम्मू-काश्मीर व लडाख हे दोन प्रदेश कोणते प्रदेश म्हणून अस्तित्वात आले ?
अ) स्वतंत्र ब) विकसनशील क) विकसित ड) केंद्रशासित

८. जम्मू-काश्मीरचा प्राचीन इतिहास कोणत्या ग्रंथात आढळतो ?
अ) डिस्कवरी ऑफ इंडिया ब) दुसरे महायुध्द क) राजतरंगिणी ड) प्राचीन भारत

९. त्रिपिटके ही कोणत्या धर्माशी संबंधित पवित्र ग्रंथ आहेत ?

अ.बौध्द ब. जैन क. पारशी ड. शीख

१०. अध्यात्मात 'आत्मज्ञान' कोणाच्या मुक्तीसाठी दिले जाते ?
अ.मन ब. बुध्दी क. शरीर ड. जीव

उत्तरे इतरत्र





# एकांतप्रिय कराकरा

कराकरा हा गरुड पक्ष्याच्या प्रजातीतील पक्षी. दक्षिण अमेरिकतील हा महत्वाचा पक्षी असून सध्या मात्र नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्यानेच या पक्ष्यांची संख्या कमी होत असल्याचं संशोधकांचे मत आहे.

साधारण ४९ ते ५८ सेंटीमीटर लांबीच्या या पक्ष्याचं वजन ८०० ते १३०० ग्रॅम इतकं असतं. साधारण दिसणारा हा पक्षी काळ्या-पांढऱ्या रंगसंगतीत असतो. याच्या गळ्याकडील भाग पांढरा असून त्यावर काळ्या रंगाचे ठिपके दिसून येतात. याची जाड व बळकट चोच वैशिष्ट्यपूर्ण असते. या चोचीच्या मागील बाजूस पिवळ्या रंगाचं आवरण असतं. तसेच फांदीवरील पकड मजबूत व्हावी, याकरता अनुकूल अशी पायांच्या बोटांची रचना असते.



मैदानी पठार, विरळ झाडंझुडपं असलेला प्रदेश, नारळाच्या बागा याठिकाणी यांचे वास्तव्य दिसून येते. उंदीर, घुशी, साप, कासव, छोटे पक्षी, बेडूक, खेकडे हे कराकराचं मुख्य खाद्य असून तो मृत प्राणीदेखील खातो.कधी कधी इतर शिकारी पक्ष्यांनी विशेषत: गिधाडांनी पकडलेलं भक्ष्य तो पळवतो. हा एकांतप्रिय पक्षी क्वचित तीन ते पाच पक्ष्यांच्या समूहात आढळतो. तसंच जर याला मुबलक प्रमाणात खाद्य सापडल्यास तो इतर कराकरांना वर्दी देऊन बोलवतो आणि ते एकत्रितपणे त्या खाद्याचा फडशा पाडतात. डिसेंबर ते मे हा कराकराचा प्रजनन काळ असतो. या काळात नर व मादी मिळून झाडावर किंवा जमिनीत खोल ठिकाणी घरटं बांधतात. मात्र हे घरटं फारसं व्यवस्थित बांधलेलं नसतं. या घरट्यात मादी अंडी घालते. २८ ते ३२ दिवस अंडी उबवल्यानतंर पिल्लं बाहेर येतात व साधारण एक महिन्यानतंर उडण्यास सक्षम होतात.

संग्राहक - अंकित जाधव



कथा

# लोभी भटजी

एका छोट्याशा गावामध्ये एक भटजी राहत होते. पूजा-अर्चा करणे, लोकांची छोटी मोठी धार्मिक कार्ये करणे याबरोबर ते थोडे फार भविष्य सांगण्याचेही काम करीत असत. त्यांची आमदनी तशी चांगली होती. लोक यथाशक्ती दक्षिणा देत असत; पण भटजी जरा जास्तच लोभी होते आणि कंजूषही. पैसा खर्च करणे म्हणजे त्यांना मोठे संकट वाटे. दक्षिणा रुपाने पैसा कसा मिळवता येईल याचा विचार सतत त्यांच्या मनात घोळत असे.

एकदा काय झाले, त्यांच्या घरात असलेली लाकडे फोडायची कुऱ्हाड तुटली. अगदी दुरुस्त होणारच नाही अशी तिची अवस्था झाली.

आता काय करावे ? मोठाच प्रश्न उभा राहिला. कुऱ्हाड काही कोणी दक्षिणा म्हणून देणार नव्हते. तशी ती मागणेही वाईट दिसले असते. विकत घ्यायची म्हणजे... तो विचारही मनातून झटकून टाकला. त्यांनी काही काळ शेजाऱ्याची कुऱ्हाड मागून आणून काम चालवले.

एक दिवस त्याच्या डोक्यात एक कल्पना चमकली. झटपट उठून ते गावातील लोहाराकडे गेले. लोहाराला एक मुलगा होता. त्याच्याकडे

पाहून ते लोहाराला म्हणाले, “अरे, तुझ्या मुलाचे ग्रह सध्या वाईट आहेत. त्याच्यावर अरिष्ट कोसळणार आहे.”

हे ऐकून लोहार व लोहारीण दोघेही भयभीत झाली. उपाय विचारला.

भटजी म्हणाले, “ब्राह्मणाला शिधा एक सुपारी, एक लोखंडाची वस्तू अशी की तिची एक बाजू अणकूचीदार धारदार असेल व दुसऱ्या बाजूला छिद्र असेल, दान दिली तर हे अरिष्ट टळून जाईल.”

लोहारणीला भटजी महाराजांची कुऱ्हाड तुटल्याची गोष्ट माहीत होती. लोखंडाची वस्तू म्हणजे कुऱ्हाडच. भटजींच्या मनात काय आहे हे तिने ओळखले.

“ठीक आहे!” लोहार म्हणाला, “उद्या सकाळी आम्ही हे सर्व दान देऊ; पण अरिष्ट टळले पाहिजे.”

भटजींनी खात्री दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी ते दान घेण्यास गेले.

लोहाराने शिधा, सुपारी दिली. भटजी महाराज कुऱ्हाडीच्या पात्याची वाट बघत होते, तोच लोहारणीने एक दाभण त्यांच्या हाती ठेवला.

ते आश्चर्याने पाहातात, तोच ती म्हणाली, “एका बाजूला अणकुचीदार, धारदार आणि एका बाजूला छिद्र असणारे दाभण तुम्ही सांगितलेल्या वर्णनाप्रमाणे आहे. ह्याचा स्वीकार करावा.” हिरमुसले होत दाभणाचा स्वीकार करुन भटजी निमुटपणे लोहाराकडून निघाले आणि आता कुऱ्हाड विकत घेतलीच पाहिजे, असा विचार करत भटजी घरी परतले.

❖❖❖

कवीता

# येता सत्संगात

सत्संगी पाऊल पडता पुढे
तन मन धनाची सेवा घडे
रोग अहंमचा ना जडे
स्वार्थाला जातील तडे ।।१।।

असतात बोल ते रोकडे
जाती-धर्माचे सरतील खडे
दिव्य गुणांचे मिळतील धडे
इथंच मानवता सापडे ।।२।।


चाले स्मरणाचे गाडे
प्रीत प्रभुशी जुडे
अनुभव प्रचिती येई रोकडे
उघडती अज्ञानाची झापडे ।।३।।

सत्संग, सेवा आहे महान
सद्गुरुचे लाभले वरदान
विरुन जाईल मनीचा मान
सदैव राहो प्रभुचे ध्यान ।।४।।

- एम. के. मजगे
किल्लारी



# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) ड
३) क
४) ब
५) ड
६) क
७) ड
८) क
९) अ
१०) ड

## शब्दकोडे ९८२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ वि | ठो | बा | | २ पा | ल | ३ क |
| वे | | | ४ ची | न | | स्तू |
| ५ का | र्ब | ६ न | | ७ शे | जा | री |
| नं | | ८ व | सं | त | | मृ |
| ९ द | १० स | रा | | | ११ हे | ग |
| | त्ता | | १२ बि | १३ हा | र | |
| १४ दे | वी | १५ का | | ऊ | | १६ हि |
| १७ व | स | न | | १८ स | त | रा |

।। १ तू ही निरंकार ।।

कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।
कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।
कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।
कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।




शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

सद्गुरु होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month




जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

॥ तुही निरंकार ॥

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

# मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड (घेर ओरम टाईप डाईज)

# मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



# बालाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील — राकेश ज. पाटील
अंकित रा. पाटील — कुशल रा. पाटील